# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर वसई-विरार यांचेकार्यालय**

**रामनगर,सृष्टी, मिरारोड पुर्व ता.जि.ठाणे**

दुरध्वनीक्र. ०२२-२९४५१००१ **mail** :pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट क्र.- ४३ दिनांक ०१/०३/२०२१

## महिलांना बोलण्यात गुंतवुन हातचलाखीने फसवणुक करणाऱ्या ०५ आरोपींना अटक करण्यात काशिमीरा पोलीसांना यश

दिनांक २५/०१/२०२१ रोजी सकाळी १०.३० वा.चे सुमारास महिला फिर्यादी, रा. गौरव व्हॅली कॉम्पलेक्स, हाटकेश, मिरारोड पुर्व हया त्यांचे कामावरुन घरी परत जात असताना हाटकेश चौक येथे अनोळखी आरोपीतांनी फिर्यादी यांना रस्त्यात थांबवुन त्यांना बोलण्यात गुंतवुन त्यांचे लक्ष विचलीत करुन त्यांचे गळ्यातील सोन्याची चैन आपलेकडील रुमालात गुंडाळण्यास लावुन हातचालाखीने फसवणुक करुन लंपास केली सदर बाबत काशिमीरा पोलीस ठाणे गु.र.नं I ७७/२०२१ भादविस कलम ४२०, ३४ प्रमाणे दि.२५/०१/२०२१ रोजी गुन्हा दाखल आहे.

सदर गुन्हयातील आरोपीतांचा सपोनि/महेंद्र भामरे यांनी त्यांचे पथकासह तांत्रीक माहितीच्या आधारे तपास करुन अहमदाबाद गुजराज येथे राहणारे ०५ आरोपीतांना राज्य गुजरात राज्यातुन वेगवेगळ्या ठिकाणावरुन ताब्यात घेवुन अटक करुन आरोपींकडे तपास केला असता आरोपींनी काशिमीरा पोलीस ठाणे येथे दाखल गुरनं १२१/२०२१ भादविस कलम ४२० गुरनं ७४७/२०२० भादविस कलम ४१९, १७०, ३४ प्रमाणे दाखल गुन्हे केले असल्याचे निष्पन्न झाले असुन आरोपींकडूण आतापर्यंत ३०,०००/- रुपये किंमतीची ११.२०० ग्रॅम वजनाची सोन्याची चैन हस्तगत करण्यात आली असुन अधिक तपास सुरु आहे.

सदरची कामगिरी श्री अमित काळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१, श्री विलास सानप, सहा.पोलीस आयुक्त मिरारोड विभाग, काशिमीरा पोलीस ठाणे चे वपोनि/श्री संजय हजारे, पोनि/विजय पवार, यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि/महेंद्र भामरे, पोउनि/धनंजय गायकवाड, पोउनि/सागर साबळे, पोना/१५७४ विश्वनाथ जरग, पो.शि/२३८२ समिर यादव, पो.शि/४१६० सनी सुर्यवंशी, पो.शि/३४०८ हनुमंत तेरवे, पो.शि/१७४३ प्रविणकुमार जाधव, पो.शि/३५२१ जयदिप बडे, पो.शि/३०७६ जयकुमार राठोड, पो.शि/३५२९ अनिल नागरे, पो.शि/३५१७ नवनाथ घुगे यांनी केली आहे.

-----------ooo--------